**प्रेसनोट** दि. 16/01/2026

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून शिरसगाव काटा, शिरूर येथील ग्राम महसुल अधिकारी यांच्यावर लाच मागणी व लाच स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिरूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय 56 वर्ष, व्यवसाय शेती |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | प्रमिला नागेश वानखेडे, वय 42 वर्षे,पद- ग्राम महसूल अधिकारी, नेम.-शिरसगाव काटा (वर्ग 3), रा. फ्लॅट नंबर 404 तक्षशिला सोसायटी, ए विंग,पठारे ठुबे नगर, खराडी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | 10,000/- (दहा हजार रूपये फक्त) |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | 7,000/- (सात हजार रूपये फक्त) |
| पडताळणी दिनांक | दि. 16/01/2026 |
| स्वीकारलेली लाच रक्कम | 7,000/- (सात हजार रूपये फक्त) |
| सापळा दिनांक | दि. 16/01/2026 |
| ठिकाण | छत्रपती संभाजीराजे चौक, नाव्हरा- तळेगाव रोड, ता शिरूर, जिल्हा पुणे |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्री. अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9860667770) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती. भारती मोरे, पोलीस उप-अधीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९८७०१५६५८६) |

**थोडक्यात माहिती :-**

यातील तक्रारदार यांची शिरसगाव काटा येथे वडिलोपार्जित जमीन असून ते त्यांचे वडीलांनी तोंडी वाटप करून दिलेले त्यांचे वाटणीस आलेल्या शेतीची लेवल करीत असताना त्यांचे भावाने सदरची लेवल थांबवून वाटणीप्रमाणे रेकॉर्ड झाल्यावर तू लेवल कर व तुझा ऊसही नंतर तोडणी कर असे सांगितले होते. त्यावरून त्यांनी सदरचे काम थांबवले होते. दिनांक 09/01/2026 रोजी शिरसगाव काटा गावचे तलाठी मॅडम ह्या तक्रारदार यांच्या शेतातील राहते घरी येऊन तुमच्या शेताचा पंचनामा करायचा आहे, तुम्ही माती विकत असल्याबाबत तक्रार आली आहे, तुम्ही तलाठी कार्यालयात येऊन भेटा असे सांगितले. त्यानंतर दिनांक 12/01/2026 रोजी तक्रारदार हे आ.लो.से.श्रीमती वानखेडे यांचे कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांना तुम्ही मला 10,000/- रुपये द्या तुमच्या बाजूने पंचनामा करते असे म्हणून लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि.कडे प्राप्त झाली होती.

यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 16/01/2026 रोजी तलाठी कार्यालय शिरगाव काटा येथे पडताळणी केली असता, आरोपी लोकसेविका श्रीमती प्रतिभा नागेश वानखेडे यांनी तक्रारदारांचे बाजूने शेतीचा पंचनामा करणेकरिता व इथून पुढे सहकार्य करणे करिता म्हणून तडजोडी अंती 7,000/- रुपयाची लाच मागणी करून लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक 16/01/2026 रोजी सापळा कारवाई केली असता लोकसेविका श्रीमती प्रतिभा वानखेडे, ग्राम महसुल अधिकारी, शिरसगाव काटा यांनी तक्रारदार यांचेकडून रू. 7,000/- लाचेची रक्कम पंचासमक्ष छत्रपती संभाजीराजे चौक, नाव्हरा- तळेगाव रोड, ता शिरूर, जिल्हा पुणे येथे स्वीकारली असता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेविका यांच्याविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशन ठाणे, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

**(मनिषा झेंडे)**
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (अति.कार्य.प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो.आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो